**महाराष्ट्र शासन**
जलसंपदा विभाग,मंत्रालय
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email:-dofa.wrd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९ ३३८१ / २२७९३०५५

---

स्मरणपत्र-१ । ई मेल द्वारा
जा.क्र.संकीर्ण २०२२/( प्र.क्र. ६२ /२०२२)/आ.(क्षेप्र) दि. ०७ /०६/२०२२

प्रति,

महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन, धरण व सुरक्षितता
सर्व कार्यकारी संचालक,( ५ पाटबंधारे महामंडळ)
जलसंपदा विभागाच्या अधिनस्त सर्व मुख्य अभियंता
जलसंपदा विभागाच्या अधिनस्त सर्व परिमंडळीय अधीक्षक अभियंता

विषय:- महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ अनुसार शासन मान्यताप्रापत संघटना तसेच नियोजित संघटनेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.
संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभागाचे क्र.संघटना१५२२/ प्र.क्र.५६/का.१६-अ, दि.१५ मार्च २०२२रोजीचे पत्र
२) समक्रमांकाचे दिनांक ०५/०४/२०२२ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणाला पाठविण्यात आलेले सं.क्र.२ येथील पत्राचे अवलोकन करावे तसेच व अनुषंगिक सं.क्र. १ येथील शासनपत्राचे अवलोकन करावे.

२. उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन दि. ०५/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासकीय कर्मचारी (औद्योगिकेतर) यांच्या संघटनांना महाराष्ट्र नागरी (सेवा) वर्तणूक नियक, १९७९ च्या नियम २९, नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच "नवीन आदर्श नियम" ची घटना व नियमांच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येते. अशा मान्यता देताना मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी कार्यरत शासन मान्य संघटना तसेच प्रस्तावित संघटनांच्या बाबतीत करावयाची कार्यवाहीच्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या संघटनांबाबत दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करुन आपला अहवाल सादर करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडून कळविण्यात आले आहे. परंतु सदर माहिती अद्याप शासना अप्राप्त आहे.

३. या अनुषंगाने आपणांस पुन्हा स्मरण देण्यात येते की, उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०२/०१/२०१७च्या परिपत्रकानुसार शासन मान्य संघटना व प्रस्तावित संघटना यांचा आढावा घेऊन संदर्भ क्र. १ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या पत्रामध्ये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी व सं.क्र.२ येथील पत्रात दिलेल्या सूचनांनुसार आपला मुद्देनिहाय अहवाल तात्काळ शासनास सादर करावा. तसेच संबंधित संघटनांचे पत्तेदेखील शासनास उपलब्ध करुन द्यावेत.

२. सदर माहिती सामान्य प्रशासन विभागास विहित कालमर्यादेत सादर करावयाची आहे याची कृपया नोंद घ्यावी.

1/6/22

( यमुना जाधव )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- आ (क्षेप्र) संग्रहार्थ.